# पनवेल महानगरपालिका, पनवेल ४१० २०६
## जाहीर नोटीस

सर्व संबंधितांना या नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेली मिळकत पनवेल महानगरपालिका हद्दीतील मौजे- रोहिंजण, ता. पनवेल येथील सर्व्हे नं. ८० पासून मौजे- आडिवली, ता. पनवेल येथील सर्व्हे नं. ५/३ पर्यंतच्या २४.०० मी. रूंदीच्या महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २६(१) अन्वये दि. ०८/०८/२०२४ तसेच महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २८(४) अन्वये दि. २५/०६/२०२५ रोजी प्रसिद्ध केलेल्या विकास योजनानुसार नियोजित रस्त्यामधील मौजे- रोहिंजण येथील सर्व्हे नं. १/६/क मधून प्रस्तावित २४.०० मी. रस्त्याखालील बाधित क्षेत्र पनवेल महानगरपालिका सदर मिळकतीच्या हितसंबंधीतांकडून हस्तांतरणीय विकास हक्काच्या (टी.डी.आर) बदल्यात ताब्यात घेत आहे. सदरील मिळकत निर्वेध व निजाखीम असल्याचा भरवसा सदर मिळकतीच्या हितसंबंधीतांनी पनवेल महानगरपालिकेस दिला आहे.

खालील नमूद मिळकतीवर खालीलप्रमाणे जमीन मालकांशिवाय अन्य कोणाचाही अन्न, वस्त्र, गहाण, दान, बक्षीस, खरेदी, पोटगी, लीज, लीन, चार्ज, इजमेंट अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास संबंधितांनी प्रस्तुतची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत सहाय्यक संचालक, नगररचना, पनवेल महानगरपालिका पनवेल ४१० २०६ यांच्या कार्यालयात कार्यालयीन दिवशी व वेळेत येऊन मुळ कागदपत्रांसह आपली हरकत लेखी स्वरूपात द्यावी. सदर मुदतीत कोणचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास खालील मिळकतीवर कोणाचाही कसलाही हक्क वा हितसंबंध नाही असे समजून किंवा असल्यास संबंधिताने तो जाणूनबुजून सोडून दिला आहे, असे समजून पनवेल महानगरपालिका जमीन ताब्यात घेईल व सदर जमिनीचा मोबदला टी.डी.आर च्या स्वरूपात खालील जमीनमालकास अदा केला जाईल, त्यानंतर येणाऱ्या कोणत्याही तक्रारींची दखल घेतली जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

परिशिष्ट १) मिळकतीचे वर्णन :- मौजे- रोहिंजण, ता. पनवेल येथील मे. टुडे ग्लोबल होम्स यांचे मालकीच्या जमीन मिळकतीमधील आरक्षणाने बाधित व रस्त्याने बाधित क्षेत्र पुढीलप्रमाणे :-
१) मौजे- रोहिंजण, सर्व्हे नं. १/६/क रस्त्याने बाधित क्षेत्र – ३०६.०० चौ. मी.

त्यास नकाशानुसार चतु:सीमा खालीलप्रमाणे -

पुर्वेस : ला.स.नं. १/६/क उर्वरित क्षेत्र
पश्चिमेस : ला.स.नं. १/६/ड (२४.०० मी. रूंद रस्त्याखालील क्षेत्र)
दक्षिणेस : ला.स.नं. १/६/अ (२४.०० मी. रूंद रस्त्याखालील क्षेत्र)
उत्तरेस : ला.स.नं. १११/२ व १११/१ (२४.०० मी. रूंद रस्त्याखालील क्षेत्र)

टिप :- उक्त जागा दर्शविणारा नकाशा पाहणीसाठी नगररचना विभागात ठेवण्यात आला आहे.

सहाय्यक संचालक नगररचना
पनवेल महानगरपालिका,

जा क्र. - पमपा/नरवि/टिडीआर/२६-२६/ ५४८ /२०२६ दिनांक : १० /०८/२०२६

टिप - सदरची जाहीर नोटीस पनवल महानगरपालिकेच्या www.panvelcorporation.com या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

PANVEL MUNICIPAL CORPORATION
पनवेल महानगरपालिका पनवेल–रायगड
PANVEL-RAIGAD